# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/७१/२०१४-१५/२५५ दिनांक : ११.१२.२०१४

**<u>आदेश केस क्र. ७१/१४-१५</u>**

१) श्रीमती इंदिरा दिगंबर कुलकर्णी, - अर्जदार
मु.पो. जाडर बोबलाद, ता. जत,
जिल्हा - सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, संख

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्रीमती इंदिरा दिगंबर कुलकर्णी, मु.पो. जाडर बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनी विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, संख उप विभागीय कार्यालयाविरुध्द मंचाकडे दि. २०.१०.२०१४ रोजी गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने शेती पंपाच्या वीज पुरवठ्यासाठी चलन रु. ६१००/- दि. २३.०९.२०१३ रोजी भरले आहे. ग्राहकाने दि. ०८.०८.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. २४.०९.२०१४ रोजी आदेश झाले. त्यामध्ये २०११-१२ या आर्थिक वर्षात पैसे भरलेल्या अर्जदारांची कामे पूर्ण झाल्यानंतर जेष्ठता क्रमांकानुसार वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

मंचाकडून अपेक्षित मदत - शेती पंपाच्या वीज पुरवठ्यासाठी चलन रु.६१००/- दि.२३.०९.२०१३ रोजी भरले आहे. सांगली कक्षाने दिलेले उत्तर तांत्रिक आहे. माझे काम केव्हा पूर्ण होणार याची कालमर्यादा नाही, बोअरवेल व मोटर बसवून दोन वर्षे होऊन गेली आहेत, अति दुष्काळ आहे, कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश असतांना यंत्रणा काम का करीत नाही ? माझे काम सत्वर करुन मिळावे.

सदर तक्रारीवर कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २०.११.२०१४ रोजी दाखल केले. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २०.११.२०१४ रोजी घेतली असता, ग्राहक प्रतिनिधी श्री. एम.जी. कुलकर्णी, सांगली हे हजर होते. वितरण कंपनीतर्फे कोणीही हजर नव्हते. ग्राहक प्रतिनिधी यांनी शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी दि. २३.०९.२०१३ रोजी रक्कम भरलेली असून अद्यापपर्यंत कनेक्शन मिळालेले नाही. ते लवकरात लवकर मिळणेबाबतचे आदेश मंचाने द्यावेत अशी विनंती केली.

कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्या लेखी अहवालानुसार -

१) ग्राहकाने दि. २३.०९.२०१३ रोजी चलन भरलेले आहे. चाचणी अहवाल कार्यालयास प्राप्त झालेला नाही. सदर कनेक्शनसाठी ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीची उभारणी करावी लागत असून त्यांचा २०१३-१४ च्या जेष्ठता यादीमध्ये क्र. ९० असा आहे. सद्या २०११-१२ च्या जेष्ठता यादीनुसार कामे सुरु आहेत.

२) सदर ग्राहकास सांगली कक्षाने दिलेल्या आदेशानुसार जेष्ठता यादीप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल. कक्षाने पारित केलेला आदेश कायम व्हावा अशी मंचास विनंती केली.

३) सदर ग्राहकाचे कनेक्शन इन्फ्रा-२ योजनेमधील तरतुदीनुसार ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वाने जेष्ठता यादीनुसार देण्यात येईल.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याबद्दल वि.प.ला आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

## <u>कारणमिमासां</u>

ग्राहकाने दि. २३.०९.२०१३ रोजी शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी चलन भरलेले आहे. त्यास ३ पोलची लघुदाब वाहिनी उभारणी करावी लागणार आहे. महावितरणच्या लेखी निवेदनानुसार सदर ग्राहका करिता २०१३-१४ जेष्ठता यादी नुसार क्रमांक ९० असून सद्या २०११-१२ च्या जेष्ठता यादीनुसार कामे सुरु आहेत. २०१३-१४ ची कामे चालू झाल्यानंतर जेष्ठता यादीप्रमाणे तक्रारदाराचे कनेक्शन देण्यात येत असल्याचे कळविले आहे.

सुनावणी दरम्यान मा. अध्यक्ष यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधून ग्राहकाचे कनेक्शन केव्हा देता येईल याची विचारणा करणेबाबत सदस्य सचिव यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे सदस्य सचिव यांनी कवठे महांकाळ विभागाचे कार्यकारी अभियंता, श्री. कांबळे यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली होती. तेव्हा त्यांनी मार्च २०१२ पर्यंतची जेष्ठता यादी पूर्ण करण्यात येत असून २०१२-१३ च्या जेष्ठता यादीप्रमाणे कामे हाती घेण्यात येत आहेत. तक्रारदाराचे कनेक्शन हे २०१३-१४ च्या जेष्ठता यादीमध्ये असल्यामुळे ठराविक मुदतीत कनेक्शन देणे शक्य होणार नाही असे सांगितले.

ग्राहकास वि.प.ने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुरवठा संहिता २००५ मधील कलम ४.४ नुसार नवीन वीज जोडणी देणे बाबत आदेश देणे योग्य होईल असे मंचाचे स्पष्ट मत झालेले आहे. त्यामुळे जेष्ठता यादीनुसार तक्रारदाराचे कनेक्शन देणे योग्य होईल. **म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नाही '** असे देण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) ग्राहकाची ठराविक मुदतीत विद्युत पुरवठा मिळणेबाबतचे वि.प.ला आदेश व्हावेत ही मागणी फेटाळण्यात येत आहे. वि.प.ने ग्राहकास पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील नियम ४.४ नुसार जेष्ठता यादीप्रमाणे विद्युत पुरवठा द्यावा.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(जी.बी. पानकर)
सदस्य सचिव

दिनांक :

बी.जी. पवार, अध्यक्ष : सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.